जा.क्र. ८०२/२०२१

पोलीस उप अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार

☎ (०२५६४) २३०००९

✉ कलेचंबइदंदकनतइंत/हउंपसण्बवउ

दिनांक :– २८/०७/२०२१

प्रति,

मा.जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधिश सो.,
जिल्हा सत्र न्यायालय ,नंदुरबार.

**विषय:–** विसरवाडी पोलीस स्टेशन गु.रजि.नं.२१/२०२१ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ (सुधारणा सन–२०१८) चे कलम ७ प्रमाणे दाखल गुन्ह्यामध्ये नव्याने नि पन्न झालेल्या आरोपीविरुध्द वाढीव कलम १२ लावलेबाबत...

**रिपोर्ट :–** जयपाल व्ही.अहिरराव, पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार याजकडून सादर

———०००———

महोदय,

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पोलीस स्टेशन | :– | विसरवाडी पोलीस स्टेशन. |
| २. | जिल्हा | :– | नंदुरबार. |
| ३. | गुरनं व कलम | :– | विसरवाडी पोलीस स्टेशन गु.रजि.नं.२१/२०२१ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ (सुधारणा सन–२०१८) चे कलम ७, १२ प्रमाणे. |
| ४. | तक्रारदार व फिर्यादी | :– | श्री.निलेश जयवंत वसावे वय–३० धंदा–शेती रा.मु.पो.वडफळी ताो.नवापुर जि.नंदुरबार. |
| ५. | आलोसे यांचे नांव | :– | १) जयसिंग गुंजाऱ्या पावरा वय– ५० वर्षे व्यवसाय–नोकरी तलाठी, (वर्ग–३), देवमोगरा सजा खांडबारा, ता. नवापुर जिल्हा. |
| ६. | नव्याने निष्पन्न झालेला आरोपी | :– | **२) वनु धेडया वळवी वय–४८ वर्षे धंदा–नोकरी कोतवाल,देवमोगरा सजा, तहसिल कार्यालय, नवापूर जि. नंदुरबार रा. मु. मरोड पो.शेही ता. नवापूर जि. नंदुरबार** |
| ७. | अटक ता. व वेळ | :– | दि. २७/०७/२०२१ रोजी १५/१३ वाजता अटक केली आहे. |
| ८. | लाचेची रक्कम | :– | १५००/–रुपये. |
| ९. | हस्तगत लाचेची रक्कम | :– | १५००/–रुपये. |
| १०. | अ.घ.ता.वेळ ठिकाण | :– | दिनांक २७/०१/२०२१ रोजी १२.२३ ते १२.३५ वाजे दरम्यान खांडबारा येथील मंडळ अधिकारी भाग खांडबारा तलाठी सजा खांडबारा कार्यालयात |
| ११. | अ.दा.ता व वेळ | :– | दि.२७/०१/२०२१ रोजी २१.४९ वाजता. |

२८/७/२१
Despatch Clerk
District Court
Nandurbar

Scanned with CamScanner

गून्ह्याची थोडक्यात हकीगत :–

यातील तक्रारदार यांच्या वडिलांचे नावे असलेल्या शेतजमीनीच्या ७/१२ उताऱ्यावरील नावात दुरूस्ती करीता केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने सबंधित नवापूर तहसिलदार यांनी तलाठी डोगेगाव यांना नावांत दुरुस्तीकरीता आदेशीत केले आहे. सदर नावांत दुरुस्तीकरीता श्री.जयसिंग गुंजाऱ्या पावरा, तलाठी डोगेंगाव ता. नवापूर यांनी २०००/रु. लाचेची मागणी केली होती. तकारदार यांचे तलाठी पावरा यांना लाच देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने तसेच तलाठी व तक्रारदार यांच्यात आर्थिक देवाणघेवाणीचा कोणत्याही प्रकारचा व्यवहार अगर भांडणतंटा नाही. अशी तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार कार्यालय येथे लेखी तक्रार दिल्याने व त्यानंतर केलेल्या पडताळणीत तलाठी देवमोगरा सजा यांनी दि.२०/०१/२०२१ रोजी पडताळणी केली असता लोकसेवक जयसिंग पावरा यांनी खांडबारा तलाठी कार्यालयात पंचासमक्ष १५००/–रू. लाचेची मागणी करून ती लाच दि. २७/०१/२०२१ रोजी पंचासमक्ष स्विकारल्यानंतर त्यांना पकडले होते. लोकसेवक पावरा यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी १५००/–रुपये लाचेची मागणी करुन ती पंच साक्षीदारा समक्ष स्विकारली म्हणुन विसरवाडी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला होता. यातील आरोपी क्र १ जयसिंग पावरा यांना सदर गुन्हयात यापुर्वीच अटक करण्यात आली आहे.

सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान दि.२०/०१/२०२१ रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान यातील आरोपी क्र. २ वनु धेडया वळवी वय–४८ व र्ष धंदा–नोकरी कोतवाल, देवमोगरा सजा, तहसिल कार्यालय, नवापूर जि. नंदुरबार यांनी यातील तक्रारदार व आरोपी कमांक १ यांचे कामाच्या अनुषंगाने झालेल्या चर्चेदरम्यान सहभागी होवून आरोपी कमांक १ यांनी तक्रारदाराकडून त्याचे नाव दुरूस्तीच्या अर्जासंबंधाने १५००/–रू.लाचेची मागणी करून ते दुस–या दिवशी येवून देण्याबाबत सांगितले होते. त्यावेळी चर्चेदरम्यान वनु वळवी यांनी तक्रारदारास आदिवासी भाषेत “पंधरासो आखे” असे सांगून तक्रारदाराने “पंधरासो” असे बोलता वनु यांनी **“वेरी तो दि दिजे”** (मराठीत – असेल तर देऊन देजो) असे तक्रारदारास सांगितले. त्यावर तलाठी पावरा यांनी “हाकालभी आवी तु देईना चाली” असे सांगितल्यावर वनु यांनी “ देख एंडो केहे मेहकी ओ काम्पुटरमा किही लेदो तु आलो ताव कि लेदो आलोतोह व्ही गियो... बराबर ऐई की फ़ाशी कोयी टाक” (मराठीत– बघ हे कसे बसे कांम्प्युटरामध्ये करून घेतले तु आला तोवर करून घेतले ... तु आला तोपर्यंत होवून गेले. ..बरोबर असं नंतर करून टाक) असे सांगितल्यावर तकारदाराने “पंधरासो रुपये माहो नाहा आहे ... हाकाल लावु ... परोव लावु.. हा.” असे सांगितले असता वनु याने तक्रारदारास **“चाली”**(मराठीत – चालेल) असे सांगितले. सदरचे संभा षण हे मराठी व आदिवासी मिश्र भा षेत असल्याने तपासा दरम्यान यातील आरोपी कमांक २ वनु हा आरोपी कमांक १ पावरा तलाठी यांचेकडे कोतवाल म्हणून कामकाज करीत असुन आरोपी कमांक १ यांनी केलेल्या लाच मागणीस त्यांनी प्रोत्साहन दिल्याचे तपासादरम्यान निष्पन्न झाले आहे.

करीता विसरवाडी पोलीस स्टेशन गु.र.नं.२१/२०२१ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ (सुधारणा सन–२०१८) चे कलम ७ प्रमाणे दाखल गुन्ह्यामध्ये यातील नव्याने निष्पन्न

Scanned with CamScanner

झालेला आरोपी क्रमांक २ वनु धेडया वळवी वय–४८ वर्षे धंदा–नोकरी कोतवाल, देवमोगरा सजा, तहसिल कार्यालय, नवापूर जि. नंदुरबार याचेविरूध्द वरील कायदयाचे ,कलम १२ प्रमाणे वाढीव कलम लावण्यात आले असून सदर आरोपीतास नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

मा.सविनय सादर

(जयपाल व्ही.अहिरराव)
पोलीस निरीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार.

प्रत माहितीस्तव सविनय सादरः–
मा.पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक.

Scanned with CamScanner

## General Diary Details
ठाणे दैनंदिनी तपशील

**State (राज्य):** महाराष्ट्र **District (जिल्हा):** नंदुरबार

**P.S. (पोलीस ठाणे):** विसरवाडी

1. **G.D. No. (ठाणे दैनंदिनी क्र.):** 008

2. **G.D. Date & Time (ठा. दै. दिनांक आणि वेळ):** 27/07/2021 14:45 वाजता

3. **G.D. Type (ठाणे दैनंदिनी प्रकार):** इतर नविन आरोपी निष्पन्न

4. **Entry for (officer) (करिता नोंद(अधिकारी )):** SHIVDASRUPCHANDDEVARE /सहाय्यक पोलीस उप-

5. **Case Type (प्रकरणाचा प्रकार) :**

6. **G.D. Brief (ठाणे दैनंदिनी संक्षिप्त):**

यावेळी आम्ही पोनि/जयस्वाल व्ही अहिराव अॅन्टी करप्शन ब्युरो ,नंदुराबार नोद करितो की, विसरवाडी पोस्टे गुरन/21/2021 भ्र.प्रअधि.1988 (संशोधीत सन 2018) चे कलम 7 प्रमाणे दि.27/01/2021 रोजी दाकल आहे सदर दाखल गुन्ह्यातील तक्रारदार यांनी दि.20/01/2021 रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषगाने त्यांचे वडिलांचे नावे असलेल्या शेतजमिनीच्या 7/12उताऱ्यातील नावात दुरुस्ती करीता तलाठी डोगेगांव यांना अर्ज केला होता.तक्रारदार यांचे वडिलांच्या नावांत दुरुस्तीकरीता श्री.जयसिंग गुंजाऱ्या पावरा,तलाठी डोगेगांव ता.नवापुर यांनी 2000/- रु.लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांना तलाठी पावरा यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांचे विरुध्द कारवाई करणेकरीता तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो,नंदुरबार कार्यालय येथए लेखी तक्रार दिली होती.त्यांनंतर केलेल्या पडताळणीत तलाठी डोगेगांव यांनी पंच साक्षीदारासमक्ष 1050/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम 27/01/2021रोजी आलोसे जयसिंग गुजाऱ्या पावरा वय-50 वर्षे व्यवसाय – नोकरी तलाठी,देवमोगरा सजा खांडबारा कार्यालयात 1500/-रुपये मागणी केलेली लाचेची रक्कम पंचसाक्षीदार समक्ष स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहात पकडण्यात आले होते सदर बाबत तक्रारदाराच्या फिर्यादीवरुन विसरवाडी पोलीस स्टेशनला वर नमुदप्माणे गुन्हा दाकल करण्यात आला होता त्यानंतर तपासादरम्यान पडताडीणीत झालेल्या संभाषणावरुन यातील तक्रारदार व तलाठी जयसिंग गुंजाऱ्या पावरा यांचे कामासंबंधी झालेल्या चर्चेदरम्यान तलाठी पावरा यांनी तक्रारदारकडुन 1500/- रुपये लाचेची मागणी केल्यावर सदर कार्यालयातील कोतवाल वनु वळवी याने तक्रादारास आदीवसी भाषेत पंदारासो आखे असे सांगुन तक्रादाराने पंधरासो असे बोलता वनु यांनी वेरी तो दि दिजे (मराठी - असेल तर देऊन देजो) असे तक्रादारास सांगितले. त्यावर तलाटी पावरा यांनी हाकालभी आवी तु देईना चाली असे सांगीत्यावरुन वनु यांनी देख एंडो केहे मेहकी ओ काम्पुटरमा कही लेदो तु आलो ताव की लेदो आलोतोहो व्हो गियो... बराबर एई की फाशी कोयी टाक (मराठीत- बघ हे कसेबसे कांम्प्युटरमध्ये करुन घेतले तु आला तोवर करुन घेतले... तु आला तोपर्यंत होवुन गेले... बरोबर असं नंतर करुन टाक) असे सांगीतल्यावर तक्रारदाराने पंधरासो रुपये माहो नाहा आहे... हाकाल लावु....परोव लावु... हा. असे सांगीतले. असता वनु याने तक्रारदारास चाली (मराठीत-चालेल) असे सांगीतले. सदरचे संभाषण हे मराठीत व आदिवासी मिश्र भाषेत असल्याने तपासादरम्यान यातील आरोपी क्र. 02 वनु हा आरोपी क्र. 01 पावरा तलाठी यांचेकडे कोतवाल म्हणुन कामकाज करीत असुन आरोपी क्र. 01 यांनी केलेल्या लाच मागणीस त्यांनी प्रोत्साहन दिल्याचे तपासादरम्यान निष्पन्न झाले आहे. त्यानंतर झाले तपासाचे कागदत्रांवरुन वरिष्ठांशी चर्चा करुन सुचनेप्रमाणे वुन ढेड्या वळवी वय- 48 वर्षे, धंदा- नोकरी कोतवाल, देवमोगरा सज्जा, तहसिल कार्यालय नवापुर जिल्हा नंदुरबार यांचे विरुद्ध विसरवाडी पो.स्टे. गुरनं. 21/2021 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 (सुधारणा सन-2018 ) चे कलम 7 प्रमाणे दाखल गुन्ह्यामध्ये नव्याने निष्पन्न झालेल्या आरोपी वनु धेड्या वळवी वय-48 वर्षे, धंदा नोकरी, कोतवाल देवमोगरा सज्जा तहसिल कार्यालय नवापुर यांचे विरुद्ध वरील कायाद्याचे कलम 12 प्रमाणे वाढीव कलम लावण्यात येत आहे.

7. **G.D. Subject (ठा. दै. चा विषय):**

गुरनं. 21/2021 मध्ये नव्याने आरोपी निष्पन्न झाल्याने वाढीव कलम लावले बाबत.

8. **Acts & Sections (अधिनियम आणि कलम):**

| Sr.No. | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
| --- | --- | --- |



Scanned with CamScanner

Report Printed on
(अहवाल मुद्रित केलेला दिनांक): 27/07/2021

Report Printed by (द्वारे अहवाल मुद्रित केला):

Name (नाव): Nitin Sudam Patil

Rank (पद): I (Inspector)

Signature of G.D. Entry By (ठा. दै. नोंद करणाऱ्याची सही):

Name (नाव): Nitin Sudam Patil

Rank (पद): I (Inspector)

No.(क्र.):

Scanned with CamScanner

## General Diary Details
## ठाणे दैनंदिनी तपशील

**State (राज्य):** महाराष्ट्र **District (जिल्हा):** नंदुरबार

**P.S. (पोलीस ठाणे):** विसरवाडी

**1. G.D. No. (ठाणे दैनंदिनी क्र.):** 009

**2. G.D. Date & Time (ठा. दै. दिनांक आणि वेळ):** 27/07/2021 15:13 वाजता

**3. G.D. Type (ठाणे दैनंदिनी प्रकार):** अटक/शरण

**4. Entry for (officer) (करिता नोंद(अधिकारी )):** SHIVDASRUPCHANDDEVARE /सहाय्यक पोलीस उप-

**5. Case Type (प्रकरणाचा प्रकार) :**

**6. G.D. Brief (ठाणे दैनंदिनी संक्षिप्त):**

यावेळी आम्ही पोनि/जयपाल व्ही. अहिरराव, लाप्रवि नंदुरबार नोंद करतो की, विसरवाडी पो.स्टे.गु.र.नं. 21/2021 भ्र.प्र. अधि. 1988 (संशोधीत सन 2018) चे कलम 7 प्रमाणे दि. 27/01/2021 रोजी दाखल आहे. सदर गुन्हयातील आरोपी क्र. 1 जयसिंग गुंजा-या पावरा यांना लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर रंगेहाथ पकडल्यावरुन फिर्यादीच्या तक्रारीवरून वर प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान आरोपी क्र.1 जयसिंग पावरा, तलाठी यांनी तक्रारदाराकडून 1500/-रू. लाचेची मागणी करतांना झालेल्या संभाशणादरम्यान त्यांचेकडे काम करणारा कोतवाल वनु ढेडया वळवी यांनी तलाठी पावरा यांनी केलेल्या लाचेच्या मागणी करीता तक्रारदारास लाच देण्याकरीता प्रोत्साहन दिल्याचे तपासादरम्यान निश्पन्न झाले आहे. करीता त्यांना आज रोजी मंडळ अधिकारी कार्यालय, खांडबारा ता. नवापूर येथून स्टाफचे मार्फतीने ताब्यात घेवून विसरवाडी पो.स्टे.येथे आणले. त्यांना सदर कारवाईचे कल्पना देवून त्यांची ग्रा.रु. विसरवाडी येथून अटकपुर्व वैदयकीय तपासणी करुन त्यांना अटकेची कारणे सांगुन मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अटी व शर्तींचे पालन करुन त्यांचे अटकेबाबत त्यांचा मुलगा नामे समुवेल वनु वळवी यास समक्ष माहिती देण्यात येवून पो.स्टे.च्या संबंधीत रजिश्टरला अटक पंचनामा करुन अटक करण्यात आली. त्यांचे अटकेबाबत त्यांचे सजाचे तलाठी हरिश पाटील यांना तसेच तहसिलदार नवापूर यांना मोबाईलद्वारे कळविण्यात आले आहे. अटक आरोपी यांना ताबे कर्मचा-यांमार्फत पुढील तपासकामी व मा. नंदुरबार न्यायालयात हजर करणेकामी सरकारी वाहनाने विसरवाडी येथून नंदुरबार कार्यालयाकरीता रवाना झालो.

**7. G.D. Subject (ठा. दै. चा विषय):**

आरोपी अटक नोद

**8. Acts & Sections (अधिनियम आणि कलम):**

| Sr.No. | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|

**Report Printed on**
(अहवाल मुद्रित केलेला दिनांक): 27/07/2021

**Report Printed by (द्वारे अहवाल मुद्रित केला):**

**Name (नाव):** Nitin Sudam Patil

**Rank (पद):** I (Inspector)

**Signature of G.D. Entry By (ठा. दै. नोंद करणाऱ्याची सही):**

ठाणे अंमलदार
विसरवाडी पोलीस स्टेशन

**Name (नाव):** Nitin Sudam Patil

**Rank (पद):** I (Inspector)

**No.(क्र.):**



Scanned with CamScanner